सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/माजअ-२०२२/प्र.क्र.१/ का-१०
१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: १८ जानेवारी २०२२

**प्रति,**
जिल्हाधिकारी (सर्व),
महानगरपालिका आयुक्त (सर्व).

**विषय:** दि. २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी २०२२ या कालावधीत लोकशाही पंधरवडा साजरा करण्याबाबत...
**संदर्भ:** राज्य निवडणूक आयोगाचे स्थायी आदेश क्र. रानिआ/ रापनों- २०१७/ प्र.क्र. १४/ का-११, दि. ६ जानेवारी २०१८.

उपरोक्त संदर्भांकित आदेशान्वये राज्य निवडणूक आयोगातर्फे दरवर्षी दि. २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत लोकशाही, निवडणूक व सुशासन या विषयावर लोकशाही पंधरवडा साजरा करण्यात येतो. गेली दोन वर्षे कोविड-१९ मुळे हा पंधरवडा साजरा करण्यावर मर्यादा आल्या. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी काळातील मोठ्याप्रमाणावरील निवडणुका लक्षात घेऊन मतदानाचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने लोकशाही पंधरवड्यांच्या निमित्ताने व्यापक प्रमाणावर जनजागृती करण्याचा राज्य निवडणूक आयोगाचा मानस होता; परंतु राज्यातील कोरोनाच्या रुग्णांच्या संख्येत वाढ झाल्यानंतर काही निर्बंध लागू करण्यात आले आहेत. त्यामुळे यंदाचा लोकशाही पंधरवडा लोकांची गर्दी होईल, अशा पद्धतीने साजरा करण्याऐवजी केवळ ऑनलाईन, अपारंपरिक आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून साजरा करावयाचा आहे.

जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, महानगरपालिका व नगरपरिषदांच्या आगामी काळात मोठ्याप्रमाणात होणाऱ्या निवडणुका लक्षात घेऊन अधिकाधिक मतदारांनी मतदानाचा हक्क बजवायला हवा. त्यासाठी या पंधरवड्याच्या निमित्ताने जनजागृती करावी. या निवडणुकांमध्ये मतदानाचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने लोकशाही पंधरवडा साजरा करण्याबाबतचे नियोजन जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या स्तरावरून करावे. महानगरपालिका निवडणुकांसाठी महानगरपालिका आयुक्तांनी पुढाकार घ्यावा. जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्त यांनी आपसात समन्वय साधून लोकशाही पंधरवडा

साजरा केल्यास आगामी निवडणुकांच्या दृष्टीने तो अधिक प्रभावी होऊ शकेल. विविध महाविद्यालयांच्या प्राचार्यांची ऑनलाईन बैठक घेवून वेबिनारसारखे उपक्रम राबविता येतील. कोरोनाबाबतच्या प्रोटोकॉलचे काटेकोरपालन करून सदर पंधरवडा साजरा करावा.

लोकशाही पंधरवडा साजरा करण्यासंदर्भात परिशिष्ट- १, २ व ३ नुसार कार्यवाही करावी. पंधरवडा साजरा करण्यासाठी राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांबाबतचा तपशीलवार अहवाल राज्य निवडणूक आयोगास सादर करावा.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला

(किरण कुरुंदकर)
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**प्रत:**

१) विभागीय आयुक्त (सर्व)
२) मा. राज्य निवडणूक आयुक्त आणि सचिव, राज्य निवडणूक आयोग यांचे स्वीय सहायक
३) राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने.

## परिशिष्ट- १

## लोकशाही पंधरवडा साजरा करण्यासाठी करावयाची कार्यवाही

| अ.क्र. | कार्यवाहीचा तपशील | जबाबदारी |
|---|---|---|
| १ | राज्यस्तरावरून प्रसिद्धी देणे | राज्य निवडणूक आयोग |
| २ | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मिती 'जय महाराष्ट्र', 'दिलखुलास' कार्यक्रमाद्वारे जनजागृती करणे. | राज्य निवडणूक आयोग |
| ३ | लोकशाही पंधरवड्याच्या कालावधीत सोशल मीडियावरून विविध संदेश प्रसारित करणे | राज्य निवडणूक आयोग |
| ४ | लोकशाही पंधरवड्यासाठी विविध प्रकारचे जनजागृतीपर संदेश तयार करणे | राज्य निवडणूक आयोग |
| ५ | आपल्या स्थानिक स्वराज्य संस्थेचा संदर्भ देऊन मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित करणारे संदेश तयार करून सोशल मीडियावरून प्रसारित करणे | जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, नगरपरिषद मुख्याधिकारी |
| ६ | जिल्हा आणि महानगरपालिकास्तरावर पत्रकार परिषद किंवा प्रसिद्धिपत्रकाद्वारे लोकशाही पंधरवडा आणि आगामी निवडणुकांत मोठ्या संख्येने मतदान करण्याबाबत आवाहन करणे | जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्त |
| ७ | मागील निवडणुकीत मतदानाचे प्रमाण कमी असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था किंवा प्रभागांचा शोध घेऊन संबंधित ठिकाणी मतदानाचे प्रमाण वाढविण्यासाठी व्यापक जनजागृती करणे | जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, नगरपरिषद मुख्याधिकारी |

0-0-0

## परिशिष्ट- २

## गर्दी टाळून राबवावयाचे उपक्रम

१) लोकशाहीची मूलभूत तत्वे, स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्व इत्यादी बाबी लोकशाही पंधरवड्याच्या निमित्ताने नागरिक/ मतदारांपर्यंत पोहचविणे.

२) लोकशाही पंधरवड्यानिमित्त राज्य निवडणूक आयोगाचे दायित्व, जबाबदारी, वैशिष्ट्ये इत्यादींबाबत जनजागृती करणे.

३) लोकशाही पंधरवड्याच्या निमित्ताने वृत्तपत्रांच्या स्थानिक आवृत्या, स्थानिक केबल वाहिन्या, सोशल मीडिया, डिजिटल मीडिया, मोबाईल एसएमएस, आकाशवाणी, एफएम केंद्रांवरून, चर्चासत्र, मुलाखती, लेख इत्यादीद्वारे जनजागृती करावी.

४) जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त व इतर विविध मान्यवरांचे मतदारांना मतदानाचे महत्व पटवून देणाऱ्या बातम्या/ लेख प्रसिद्ध करणे.

५) राजकीय पक्षांशी संबंधित नसलेल्या स्थानिक सिनेमा, क्रीडा, संस्कृती, साहित्य इत्यादी क्षेत्रांतील मान्यवरांचे मतदार जागृतीसंदर्भात आवाहन करणारे संदेश (व्हिडिओ) सोशल मीडियावरून प्रसारित करणे.

६) लोकशाही पंधरवड्यांचा उपक्रमांमध्ये विविध महाविद्यालये, विद्यापीठे, स्वयंसेवी संस्था, अराजकीय संस्था, गृहनिर्माण संस्था इत्यादींना ऑनलाईन पद्धतीने सहभागी करून घ्यावे.

७) विविध शासकीय वाहनांवर लोकशाही पंधरवड्याच्या संदेशाचे पोस्टर्स् लावणे. उदा. घंटागाड्या, परिवहन उपक्रमाच्या बस व अन्य वाहने.

८) एनसीसी, एनएसएस, स्काउट अँड गाईड इत्यादींसारख्या उपक्रमातील विद्यार्थ्यांच्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने लोकशाही पंधरवडा आणि मतदानाचे महत्व पटवून देणे.

९) मतदानाचे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने ऑनलाईन पद्धतीने निबंध, वकृत्व, वादविवाद, कथाकथन इत्यादी स्पर्धांचे आयोजन करणे.

0-0-0

## परिशिष्ट- ३

## खालील विषयांसंदर्भात नागरिक/ मतदानांना अवगत करणे

लोकशाही पंधरवडा साजरा करताना विविध विषयांवर जनजागृती करता येईल, त्यासाठी खालील विषयांवर विविध प्रकारचे संदेश तयार करून ते विविध माध्यमांतून नागरिक/ मतदारांपर्यंत पोहचविता येतील.

**लोकशाहीची मुलभूत तत्वे:**

नागरीकांचा सहभाग, समानता, राजकीय सहिष्णुता, जनतेशी उत्तरदायित्व, कामकाजातील पारदर्शकता, नियमित व मुक्त, निर्भय आणि निष्पक्ष निवडणुका, आर्थिक स्वातंत्र्य, सत्तेच्या दुरुपयोगावर नियंत्रण- सत्तेचे विकेंद्रीकरण, नागरिकांच्या हक्कांचा जाहिरनामा, निवडणुकीचा निकाल सर्वांनी मान्य करणे, मानवी हक्कांची जोपासना, बहुपक्षीय प्रणाली, कायद्याचे राज्य इत्यादी.

**राज्य निवडणूक आयोगाचे दायित्व:**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या मुक्त, निर्भय, निष्पक्ष व पारदर्शक पध्दतीने विहीत मुदतीत पार पाडणे. सर्व राजकीय पक्ष आणि उमेदवारांना निवडणूक लढण्यासाठी समान संधी उपलब्ध करून देणे.

**राज्य निवडणूक आयोगाची वैशिष्ट्ये:**

राज्य निवडणूक आयोग संविधानिक व शासनापेक्षा वेगळी व स्वतंत्र संस्था, भारत निवडणूक आयोगाच्या समतुल्य दर्जा आणि अधिकार, आयोगाच्या आवश्यकतेनुसार सर्व संसाधने (अधिकारी/कर्मचारी वर्ग, वित्त इ.) पुरविणे शासनास बंधकारक, कायद्यातील त्रुटी/ असंदिग्ध बाबींवर स्पष्टीकरण/ पुरक आदेश देण्याबाबतचे वैधानिक अधिकार, प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी मा. उच्च न्यायालय व मा. सर्वोच्च न्यायालयाकडे शासनाविरोधात रिट याचिका दाखल करण्याचे स्वातंत्र्य.

**स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्व:**

सत्तेच्या विकेंद्रीकरणाला चालना, प्राथमिक शिक्षण, पाणी, रस्ते, पथदिवे, स्वच्छता, उद्याने, जन्म-मृत्यूच्या नोंदी करणे इत्यादी प्राथमिक सोयी- सुविधा स्थानिक स्वराज्य संस्थांकडून पुरविल्या जातात. यातून स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्व लक्षात येते.

**मतदार जागृतीसाठी संदेश/ स्लोगन:**

- मतदान करा... लोकशाही बळकट करा!
- आम्ही करू मतदान... विकासात देऊ योगदान!
- प्रलोभनाला नाही पडणार बळी... लोकशाहीला देऊ बळकटी!

- माझं मत... माझी ताकद!
- माझं मत.... माझा आवाज!
- निशाणी मतदानाची... आपल्या अभिमानाची!
- निर्भय मतदान... देशाचा सन्मान!
- आम्ही जागृक मतदार... उघडू विकासाचं द्वार!
- आम्ही मतदार... विकासाचे भागीदार!
- नको वस्तू, नको पैसा... आहे उज्ज्वल भविष्याचा ध्यास!
- माझं मत बहुमोल... पैशात नाही होत त्याचं मोल!
- प्रलोभनाला बळी पडू नका... निर्भयपणे मतदान करा!
- नको सोसायटीला रंगरंगोटी, नकोत मोफत यात्रा, सहली... मतं आहे माझं बहुमोल, त्याचं नाही होत पैशात मोल!
- मतदार राजा... लोकशाहीचा धागा!
- मतदारा राजा जागा हो... लोकाशाहीचा धागा हो!
- मी मतदार राजा... गाव/ शहराचा भाग्यविधाता!
- एक मतानेही फरक पडतो... गाव/शहराचे नवनिर्माण होते!
- एक मत करू शकते गाव/ शहराचे नवनिर्माण
- माझं एक मत घडविले गावाचं/ शहराचं भविष्य
- आई- बाबा, माझ्या भविष्यासाठी मतदान करा

0-0-0

“लोकशाही पंधरवडा” साजरा करण्याबाबत-
“लोकशाही, निवडणूक व सुशासन”या विषयावर
सर्वसामान्यांसाठी सतत शिक्षण देण्याकरिता...

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/रापनों -२०१७/प्र.क्र. १४/का-११,
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक- ६ जानेवारी, २०१८.

भारतीय संविधानाच्या उद्देशिकेप्रमाणे भारत हा सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, प्रजासत्ताक (Sovereign, Socialist, Secular, Democratic Republic) देश असून, त्यांनी त्रिस्तरीय लोकशाही पध्दत स्वीकारली आहे. ही लोकशाही बळकट करण्याच्या दृष्टीने सन १९९२ मध्ये ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीद्वारे स्थानिक स्वराज्य संस्थांना “स्वतंत्र स्थानिक शासन” म्हणून सांविधानिक मान्यता देण्यात आली असून त्यांच्या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शकरित्या घेण्यासाठी प्रत्येक राज्यामध्ये स्वतंत्र राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आली.

२. लोकशाही बळकटीकरणासाठी जरी सर्व स्तरावर लोकांचा सक्रीय सहभाग आवश्यक असला तरीही गेल्या दोन दशकात झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा अनुभव लक्षात घेता अनेक मुद्द्यांवर आता कार्यवाही करणे आवश्यक झाले आहे, उदा. :-

(i) देशाच्या विकास प्रक्रियेमधील स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्व, स्थान व भूमिका अधोरेखित करणे.

(ii) राज्य निवडणूक आयोग शासनापेक्षा स्वतंत्र असल्याची जाणीव करून देणे.

(iii) लोकशाहीचे संवर्धन, संरक्षण आणि बळकटीकरण (Preservation, Protection & Strengthening) करण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य निवडणूक आयोग आणि शासनाबरोबरच सर्वांचीच आहे, याबाबत व्यापक कार्यक्रम हाती घेणे, इत्यादी.

रोटा/एच-१६८१[३००-१-२०१८]-१

३. वरील बाबी लक्षात घेता राज्य निवडणूक आयोगाने गेल्या २-३ वर्षांमध्ये अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत :-

(i) स्थानिक स्वराज्य संस्थांचे व त्यांच्या निवडणुकांचे महत्व, याबाबत सर्व स्तरावरील अधिकारी व पदाधिकारी यांना अवगत करणे.

(ii) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेताना लोकसभा व विधानसभा निवडणुकांप्रमाणे सर्व काळजी व दक्षता घेणे.

(iii) स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत संशोधन करणे.

(iv) राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालयांच्या प्रथम वर्गामध्ये प्रवेश घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांकडून प्रवेश अर्जाद्वारे "१८ वर्षे पूर्ण झाल्याबरोबर मी माझे नाव मतदार यादीत नोंदवून घेणार आहे", या आशयाचे प्रमाणपत्र घेणे;

(v) विद्यापीठे व महाविद्यालयांतील प्रथम वर्षाच्या सर्व विषयांसाठी "लोकशाही, निवडणूक व सुशासन" हा विषय अनिवार्य करणे, इत्यादी.

४. ७३ व ७४ व्या घटना दुरुस्तीस २५ वर्षे पूर्ण झाल्याच्यानिमित्ताने राज्य निवडणूक आयोगाच्या पुढाकाराने दिनांक २ व ३ नोव्हेंबर, २०१७ रोजी "लोकशाही, निवडणुका व सुशासन" या विषयावर एक राष्ट्रीय परिषद मा. राज्यपाल महोदय व मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आली होती. या परिषदेमध्ये "लोकशाही सुदृढ करण्यासाठी सर्व लोकांना आवश्यक त्या सर्व विषयांवर सतत शिक्षणाद्वारे जागरुक करणे आवश्यक आहे" ही बाब दिसून आली. म्हणून "लोकशाही, निवडणुका व सुशासन" या विषयावर सर्व लोकांना सतत शिक्षण देण्यासाठी काही नवीन उपाययोजना करण्याची बाब राज्य निवडणूक आयोगाच्या विचाराधीन होती. सर्व बाबींचा विचार करून राज्य निवडणूक आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

## आ दे श

(अ) राज्यामध्ये दरवर्षी २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत लोकशाही पंधरवडा साजरा करण्यात यावा.

(ब) प्रजासत्ताक दिनी दिनांक २६ जानेवारी रोजी होणाऱ्या सर्व शासकीय / निमशासकीय कार्यक्रमामध्ये मुख्य वक्त्यांच्या भाषणामध्ये "लोकशाही, निवडणूक व सुशासन" या विषयावर कमीत कमी ३ ते ४ वाक्ये असावीत. यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्व; निर्भय, मुक्त व पारदर्शक निवडणुका घेण्यासाठी सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी निर्भीडपणे काम करण्याची गरज; लोकशाही जोपासण्यासाठी व टिकविण्यासाठी सर्व लोकांनी जागरुक राहण्याची गरज, इत्यादी विषयांचा समावेश असावा.

(क) तसेच दिनांक २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी या कालावधीत होणाऱ्या सर्व शासकीय व निमशासकीय कार्यक्रमांमध्ये व तसेच मुख्य वक्त्यांच्या भाषणामध्ये या विषयावर कमीत कमी ३ ते ४ वाक्ये असावीत. ("ब" प्रमाणे) "लोकशाही, निवडणूक व सुशासन" या विषयाचे बॅनर्स लावण्यात यावेत.

(ड) या कालावधीत (दिनांक २६ जानेवारी ते १० फेब्रुववारी) सर्वांच्या मदतीने मोठ्या प्रमाणावर वरील विषयावर (लोकशाही, निवडणूक व सुशासन) जनजागृती मोहीम हाती घेण्यात यावी, उदा.-

(i) विद्यापीठे व महाविद्यालयांमध्ये या विषयावर निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, इत्यादींचे आयोजन करावे.

(ii) सर्व उद्योग समूहांनी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करावे.

(iii) संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांचे नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी यांनी निवडणुकीच्या वेळी दिलेल्या वचनपूर्तीच्या अनुषंगाने खुलामंच/खुलीचर्चा यासारखे कार्यक्रम आयोजित करावेत.

(iv) वृत्तपत्रे, मासिके यासारख्या छापील, सोशल मीडिया व स्थानिक केबल नेटवर्क यांचा वापर करून उपरोक्त कालावधीत ७३ व ७४ वी राज्य घटना दुरुस्ती, त्याअनुषंगाने निर्माण करण्यात आलेली लोकशाहीची त्रिस्तरीय रचना, तसेच नागरिक व लोकप्रतिनिधी यांच्या जबाबदाऱ्या व कर्तव्य याबाबत माहिती द्यावी.

(v) आवश्यक त्या ठिकाणी होर्डिंग्ज, बॅनर्स, (टी.व्ही., रडिओ, प्रेस, इत्यादी) लावणे.

(vi) सर्वांची मदत घेणे, उदा. रेस्टॉरन्ट/हॉटेल्स, बँकांच्या शाखा, मॉल्स, इत्यादी

५. पंधरवडा योग्य रितीने साजरा करण्याच्या दृष्टीने सर्व विभागाच्या सचिवांनी त्यांच्या अधिनस्त सर्व कार्यालयांना आवश्यक त्या सर्व सूचना द्याव्यात.

६. जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी व महानगरपालिका स्तरावर महानगरपालिका आयुक्त; तसेच विभागीय स्तरावर विभागीय आयुक्त यांनी सर्व विभागांशी समन्वय साधून पंधरवड्याची रुपरेषा आखावी व पंधरवडा यशस्वीरीत्या साजरा होईल, याची दक्षता घ्यावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

( शेखर चन्ने )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव
३. सचिव (सर्व विभाग)
४. विभागीय आयुक्त (सर्व)
५. महानगरपालिका आयुक्त (सर्व)
६. जिल्हाधिकारी (सर्व)
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८. सर्व विद्यापीठे
९. राज्य निवडणूक आयोगातील कार्यासने
१०. निवड नस्ती

-----------